# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

२८, क्वीन्स गार्डन,जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे - ४११ ००१.

Email: dg@barti.in Website: https://barti.maharashtra.gov.in


**जा.क्र.बार्टी/वैधता प्रमाणपत्र/२०१८-१९/ ४०४२** **दिनांक — १९ जुन, २०१८.**

प्रति,
श्री. ए. ई. रायते (भा.प्र.से.),
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, ८वा मजला,
न्यु एक्सेलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई — ४०० ००१

**विषय- सीईटीद्वारे कॅपसाठी अर्ज केलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देणे. जात वैधता प्रमाणपत्र नसलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांची नावे पाठविणेबाबत.**

**संदर्भ- सीईटी सेलमध्ये संपन्न झालेली बैठक- दिनांक १५-०६-२०१८.**

महोदय,

वरील विषयाच्या अनुरोधाने आपणास सादर करण्यात येते की, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य् विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१२/प्र.क्र.२१७/ मावक, दिनांक २९ ऑगस्ट, २०१२ अन्वये समित्यांच्या कामाचा आढावा घेणे, त्यांचेवर प्रभावी प्रशासकीय नियंत्रण ठेवणे आणि त्यांच्याशी समन्वय साधणे इत्यादी कामासाठी "मुख्य समन्वयक, जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या" म्हणून महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना नियुक्त करण्यात आलेले आहे.

३. दिनांक १५ जून, २०१८ रोजी आपल्या कार्यालयात संपन्न झालेल्या उच्च स्तरीय बैठकीमध्ये निर्णय झाल्याप्रमाणे आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या आखत्यारितीमध्ये ज्या विभागाच्या सामायीक प्रवेश परीक्षा घेतल्या जाता, त्या विभागाच्या ज्या अभ्यासक्रमासाठी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्याबाबतचा अभ्यासक्रम निहाय माहिती कृपया या कार्यालयास पाठविण्याबाबत संबंधित विभाग / परीक्षा समन्वयक यांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

४. ज्या विद्यार्थ्यांनी सामायीक प्रवेश परीक्षेकरिता आवेदनपत्र दाखल केलेले असून, ज्यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्रासाठी समितीकडे दाखल केलेल्या प्रस्तावाची पोहच पावती आहे, तथापि त्यांना अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशा विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय यादी cvc@barti.in या ई-मेल आयडीवर पाठवावी.

५. प्रत्येक जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे ई-मेल आयडी सोबत पाठविण्यात येत आहेत. त्या ई-मेल आयडीवर सुध्दा आपल्या स्तरावरुन अशा विद्यार्थ्यांची माहिती संबंधित समितीस परस्पर पाठविण्यात यावी, जेणेकरुन त्यांचे अर्ज तातडीने निकाली काढण्याबाबत नियोजन केले जाईल.

६. या कार्यालयाने दिनांक १७ जून, २०१८ रोजी श्री. एस.बी.उपरवट यांना ई-मेलद्वारे विद्यार्थ्यांची माहिती कोणत्या तक्त्यात पाठवावयाची आहे, या विषयी पत्रव्यवहार केलेला आहे. कृपया त्या तक्त्यामध्ये विद्यार्थ्यांची माहिती संबंधित समितीस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे पाठविण्याबाबत संबंधितांना सूचना देण्याबाबत विनंती आहे.

आपला विश्वासू,

**(कैलास कणसे)(भापोसे)**
**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे तथा मुख्य समन्वयक, जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या, महाराष्ट्र राज्य**

**प्रत -**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
३. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. मा. उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
५. मा. महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, गोखले नगर, पुणे
६. मा. आयुक्त, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसास आणि मच्छ व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
७. अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)
८. उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)
९. संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (सर्व)